
६४

ISSN-2249-3034
UGC CARE Listed Journal

वर्ष १६ वे / अंक ४ था/आक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर - २०२२



सर्वधारा

UGC CARE Listed Journal

ISSN-2249-3034

सर्व साहित्य व कला प्रवाहांना वाहिलेले नियतकालिक

वर्ष १६ वे । अंक चौथा।

आक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर -२०२२

। मार्गदर्शक ।

**प्रा. वसंत आबाजी डहाके**

**प्रा. रंगनाथ पठारे**

। संपादक ।

**डॉ. सुखदेव ढाणके**

। कार्यकारी संपादक ।

**डॉ. अजय देशपांडे**

। संपादक मंडळ ।

**डॉ. देवानंद सोनटक्के (९८६०२६३१६३)**

**डॉ. गजानन बनसोड (९७३०४१९१५९)**

**डॉ. अण्णा वैद्य (९४२०१२५६८१)**

**डॉ. भूषण रामटेके (९३२५५४४२३२)**

---

**। वर्गणी ।**

त्रैवार्षिक रु. १०००/- पंचवार्षिक रु. १५००/- दशवार्षिक रु. ३०००/-

**। ऑनलाईन वर्गणीसाठी ।**

**संपादक, 'सर्वधारा'**

**बँक ऑफ महाराष्ट्र,** शाखा- धामणगाव रेल्वे, जि. अमरावती.

**A/c No. 20160012989,** IFSC Code - MAHB 0000056

(ऑनलाईन वर्गणी पाठवताना पावतीचा स्क्रिनशॉट व पत्ता **9422915110** या व्हॉटसअॅप क्रमांकावर पाठवणे आवश्यक आहे.)

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता -**

**डॉ. सुखदेव ढाणके**

१-अ, कल्पतरू सदन, से.फ.ला. हायस्कूल जवळ

धामणगाव रेल्वे, जि. अमरावती-४४४ ७०९

भ्रमणध्वनी- **9422915110** **E-mail :** sarvadhara07@gmail.com

अक्षरवैदर्भी
UGC CARE Listed Journal
ISSN-2249-3034

सर्व साहित्य व कला प्रवाहांना वाहिलेले नियतकालिक
वर्ष १६ वे । अंक चौथा। ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर -२०२२

**लेख –**

**संत बंका व संत निर्मळा यांचे अभंग : अर्थ आणि अन्वयार्थ** – डॉ. माधव पुटवाड/१

**शोध नाट्यशास्त्र संहितांचा** – डॉ. सतीश पावडे/३८

**लोकशाहीर पुंडलिक फरांदे : लोकरंजनातून लोकशिक्षण देणारा लोकशिक्षक**
– प्रा.डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात/४६

**आचार्य कमळाऊसा : चरित्र व कर्तृत्व–** डॉ. अण्णा वैद्य/५२

**कवी आणि कविता**

माझी कविता – माझी भूमिका / रमेश मगरे/५७

**ग्रंथचर्चा**

**मेळघाटच्या कविता** – दा. गो. काळे/६३


**प्रश्न उपस्थित करणारी प्रश्नांची मातृभाषा** – अजय कांडर/६८

**मुखपृष्ठ व रेखाचित्रे** – डॉ. सुभाष बाभुळकर, नागपूर भ्रमणभाष : ९४२३१०२२०६

**साहित्य पाठविण्याचा पत्ता :**
**डॉ. अजय देशपांडे,** मराठी भाषा व साहित्य विभाग
लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळ ४४५ ३०४
भ्रमणध्वनी- 9850593030 **E-mail :** deshpandeajay15@gmail.com

**अक्षरजुळवणी व मुद्रण :**
**पूजा कॉम्प्यूटर्स** , मोतीनगर, अमरावती. मो. 9370616276, 8180985638
E-mail Id : rajeshdeulkar111@gmail.com

* या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



# लोकशाहीर पुंडलिक फरांदे : लोकरंजनातून लोकशिक्षण देणारा लोकशिक्षक

प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

(समाजाला आपल्या शाहिरीच्या माध्यमातून लोकरंजनातून लोकशिक्षण देणारे लोकशाहीर म्हणजे साताऱ्याचे पुंडलिक फरांदे होत. त्यांचा जन्म १५ ऑगस्ट, १९२३ चा, त्यामुळे ऑगस्ट २०२२ पासून लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांची जन्मशताब्दी चालू होत आहे. त्यानिमित्त...)

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील एक नामवंत शाहीर अशी प्रसिद्धी मिळविलेले लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने मराठी शाहिरी क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले. लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांचा जन्म १५ ऑगस्ट, १९२३ रोजी झाला. त्यांचे मूळ गाव आनेवाडी, ता. जावली, जि. सातारा. पण वडील श्रीपतराव सातारा कँप येथे क्लबमध्ये उद्यानाचे मुकादम होते. (स्कूल बोर्ड येथे नाईक होते) त्यामुळे त्यांचे बालपण व शिक्षण साताऱ्यातच झाले. त्यांची आजी पंढरीच्या विठोबाची परमभक्त म्हणून तिने या बाळाचे नाव ठेवले 'पुंडलिक'. त्यांनी शाहिरी वाङ्मयाच्या क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून

हे क्षेत्र समृद्ध केले. पोवाडा, लावणी व लोकनाट्य ह्या तीनच नात्यांनी नव्हे तर गीतकार या नात्यानेही त्यांनी केलेली साहित्यिक कामगिरी दखल घेण्याजोगी महत्त्वाची आहे. शाहीर या नात्याने त्यांचे कार्य एकीकडे अव्याहतपणे चालू असतानाच दुसरीकडे इतरांच्या संसारांना हातभार लावणारा पोशिंदा ह्या नात्याने पण जनसेवेचेच काम केले आहे. त्यांनी आपली दृष्टी फक्त आर्थिक लाभावर न ठेवता प्रबोधनावर भर दिला. भारत हा खेड्यांचा देश असल्यामुळे ग्रामीण भागातील लोक सुधारल्याशिवाय देशाची प्रगती नाही. हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे गाव, राज्य व राष्ट्र यांच्या उभारणीसाठी शाहिरांनी आपले सर्वस्व पणाला लावले. माणूस घडला कसा, घडतो कसा आणि आपल्याबरोबर इतरांना घडवतो कसा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांच्याकडे पाहता येईल. प्रबोधनाची व परिवर्तनाची आंतरिक उर्मी सहकाऱ्यांच्या मनात स्थिर करून 'लोकरंजनातून लोकशिक्षण' देणारा हा महाराष्ट्रातील एकमेव शाहीर असावा. असे मला वाटते.

**लोकशाहिरी**

संत-पंत-तंत अशी साहित्यिक परंपरा असणाऱ्या महाराष्ट्रात तंत साहित्याला म्हणजे शाहिरी वाङ्मयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संतांचे अध्यात्म व पंडितांच्या पांडित्याइतकेच शाहिरांच्या शाहिरीला महत्त्व आहे. महाराष्ट्रातील श्रमजीवी समाजाचे मनोरंजन करणे या हेतूने ही लोकशाहिरी निर्माण झाली. पुढे रंजनाबरोबरच शिक्षण देण्याच्या हेतूने त्यात भर पडली व लोकशिक्षण देण्यासाठी शाहिरी कलापथके पुढे सरसावली. ''मराठी शाहिरी ही जरी भक्तीप्रधान कविता म्हणून जन्माला आलेली असली तरी तिच्या विकासात काळाची गरज म्हणून तिने शिवशाहीत कवी शाहीर आणि गायक शाहीर अशी दोन रूपे धारण केली. कवी शाहिराला गायकीची ढब नसते. परंतु रचनाकार म्हणून तो शाहीर असतो. तर गायकीच्या ढंगावर इतरांनी शाहिरी रचना सादर करणारा गायकही शाहीर संबोधला जातो. कोणी त्याला 'लोकशाहीर' असेही म्हणतात.'' अशा या दोन शाहिरी व्यक्तिमत्त्वाला अनुरूप असणाऱ्या व्यक्ती जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्या दोन शाहिरांची व्यक्तिनामे एकत्र करून ते आपले शाहिरी विशेषनाम रुढ करतात. जसे 'बाबाजी आबाजी' (कोइचलकर) १५ वे शतक, 'होनाजी बाळा' १७ वे शतक, 'शंभू-राजू' १९ वे शतक, 'गंगू-हैबती' १९ वे शतक, 'शिवा-संभा' २० वे शतक, 'काळू-बाळू' २० वे शतक.

फरांदे शाहिरांनी मात्र 'आपले कलापथक' ची निर्मिती करून लोकांचे प्रबोधन करून, लोकांना: लोकांच्या भाषेत लोकशिक्षण देऊन त्यांच्याकडूनच उत्स्फूर्त 'लोकशाहीर' ही पदवी मिळविली. लोकांच्या सुख-दु:खाशी व लोकांच्या जीवनाशी एकरूप झालेला हा शाहीर खऱ्या अर्थाने लोकशाहीर शोभतो. ते लोकांच्यात असणारी

अंधश्रद्धा व रुढीदास्य, जातीसंस्था व वर्णव्यवस्था, दैववादी विचारसरणी, कर्मकांड यावर काव्यातून प्रहार करीत असत. त्यांचे हे कसब उल्लेखनीय होते. उसनवारीचा आव न आणता त्यांनी जनसामान्यांच्या अंत:करणाचा ठाव घेतला. लोकमानस ओळखून त्यांच्यात विचारांची पेरणी केली व समाजपरिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला. शाहिरांनी लोकांच्या मनातील भावना, विचार यांना 'शब्दरूप' दिले. स्वत:च्या सुरेल आवाजाने त्याला नादमयता प्राप्त करून दिली. लोकांसाठी रचना करून लोकांसाठीच सादर करणारा हा लोकशाहीर लोकशिक्षणाचे चालते बोलते विद्यापीठ होते यात शंका असण्याचे कारण नाही.

## लोकरंजनातून लोकशिक्षण

लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांनी स्थापन केलेल्या 'आपले कलापथक' चा उद्देशच 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हा होता. समाजात असणारे अज्ञान, अंधश्रद्धा व अनिष्ट रुढी दूर व्हाव्यात व समाज सजग, सुजाण व समर्थ व्हावा या हेतूने शाहिरांचे कार्य चालू होते. त्यामुळेच शाहिरांचे सहकारी लाहिगुडे यांना ते बंडखोर शाहीर वाटतात. ते म्हणतात, "शाहीर फरांदे यांच्या कार्यक्रमाची वैचारिक बैठक वास्तववादी व शास्त्रीय स्वरुपाची आहे. शास्त्रीय प्रगतीच्या आड येणारी अंधश्रध्दा व रुढीदास्य, सामाजिक समतेच्या म्हणजेच धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेच्या आड येणारी जातीसंस्था किंवा वर्णव्यवस्था, माणसाची कर्तृत्वशक्ती व विचारशक्ती खुरटून टाकणारी दैववादी विचारसरणी आणि परोपजीवींचे धार्मिक सिद्धांत, संकेत व कर्मकांड ह्या सगळ्यांवर लोकशाहीर फरांदे यांनी अत्यंत आवेशाने प्रहार केले. हे मानसिक दौर्बल्य नाहीसे केल्याशिवाय लोकशाही लोकजीवनात रुजणार नाही. ती विकास पावणार नाही आणि राष्ट्रीय एकात्मतेचे स्वप्न साकार होणार नाही, अशी ह्या लोकशाहिराची श्रद्धा आहे. त्यामुळेच प्रत्येक कार्यक्रमात त्यांची तळमळ दिसून येते. ते तादात्म्य पावलेले आढळून येतात. उसनवारीचा आव आणलेल्या दिखावू शाहीरापेक्षा अंत:करणाचा ठाव घेणारा हा लोकशाहीर आगळा वाटतो. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न व विलोभनीय वाटते." समाजात समता, बंधुता नांदावी तसेच सामान्य जनतेने आपली ताकद ओळखून समाज परिवर्तनासाठी तयार व्हावे यासाठी शाहिरांनी जोशपूर्ण कार्यक्रम करून समाजाला जागृत केले. समाजात उठाव घडवून आणला. जनतेतील देशप्रेम जागृत केले. त्यामुळेच दिनकर पाटील शाहिरांना सेनानी संबोधतात आणि लिहितात, "महात्माजींच्या आदेशानुसार हातात शस्त्र न धरता बंदुकीसमोर छाती उघडी करण्याची हिंमत आपल्याला कुणी दिली? शाहिरांनीच ना? म्हणजे शाहीर हेच स्वातंत्र्याचे पहिले सैनिक आहेत; हे आपल्याला मान्य केलेच पाहिजे आणि अभिमानाची गोष्ट आहे. लोकशाहीर पुंडलिक फरांदे हे त्या सैनिकांचे सेनानी आहेत. स्वातंत्र्ययुद्धात त्यांनी केलेला उठाव लोकमान्य झाला आहे. लोकशाहीर ही लोकांनी अनाहूतपणे दिलेली पदवीच याची साक्ष आहे" शाहिरांनी जनतेत राष्ट्रप्रेम उभे

केले. मनोरंजन करीत करीत त्यांना लोकशिक्षण दिले व त्यांच्यात राष्ट्रप्रेम चेतविण्याचे कामही केले.

भारत हा कृषिप्रधान व खेड्यांचा देश असल्याने जास्तीत जास्त लोकसंख्या खेड्यात विखुरलेली आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण समाजाला अभिनेत्यांपेक्षा शाहिरांचे खूप आकर्षण आहे. तो अभंगाप्रमाणेच पोवाड्यांचाही भोक्ता आहे. तसेच गवळणींबरोबरच लावण्यांचेही त्याला आकर्षण आहे. खेड्यातील बहुतांश जनता निरक्षर असल्याने आपोआपच ते प्रबोधनाकडे वळाले. शाहीर पुंडलिक फरांद्यांसारख्या शाहिरांनी त्यांची ही भूक भागविली आहे. जनतेला प्रबोधनात्मक शिक्षण दिले आहे. शाहिरांना १९६९ साली पाठविलेल्या पत्रात बाजीराव चव्हाण म्हणतात, ''लोकरंजनातून लोकशिक्षण या तत्वावर शाहीर फरांदे यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजतागायत अत्यंत मागासलेल्या सामाजाला जागृत करण्याचे महान कार्य अंगीकारले आहे.'' निद्रिस्त समाजाला जागृत करण्याचे मोलाचे काम शाहिरांनी केले आहे. हातात डफ आणि मुखात शब्दांचा आवेश घेऊन समाजपरिवर्तनाचे कंकण हाती बांधून अहर्निश झटणारा हा शाहीर समाजात आपली एक वेगळी जागा निर्माण करतो. रसिक श्रोते त्यांच्या कार्यक्रमाने मंत्रमुग्ध होत असत. द.स. झोडगे म्हणतात, ''फरांदे हे निव्वळ करमणूकीकरता गाणे गात नाहीत. त्यांच्यापुढे सौंदर्याची निर्मिती, देशाचे सरंक्षण, देशाची समृद्धी, नवसमाजरचना, लोकशिक्षण ही ध्येये उभी आहेत आणि त्यासाठीच ते अहर्निश झटत असतात आणि म्हणून ते वास्तववादी शाहीर वाटतात. श्रोत्यांपुढे ते मृगजळ उभे करीत नाहीत. उगाच आशादायक कल्पनाचित्रे उभी करीत नाहीत. जीवनाचे त्यांना जसे दर्शन घडले तसे ते आपल्या शाहिरी-गीतांतून रंगवितात. त्यांच्या गीतांची ओळन्-ओळ मानवी जीवनाच्या खोल अशा अर्थाने भरलेली असते. ती अद्भूत माधुर्याने इतकी रसाळ असते की, जीवन कसे आहे हे आपणास कळत नाही, तथापि जीवन कसे असावे याची जाणीव ती करून देते. त्यामुळे सर्वसामान्य माणसे त्यांच्या कार्यक्रमाच्या वेळी मंत्रमुग्ध होऊन जातात.'' मनोरंजन हा शाहिरांचा मुख्य हेतून नसून 'लोकशिक्षण' हा प्रथम हेतू असल्याने लोकांना त्यांच्याच भाषेत समर्पक उदाहरणांसह पटवून देणे हे कसब त्यांना प्राप्त झाले होते. सामान्य जनतेला प्रगतीची वाट दाखविणे, त्यांच्यात विश्वास निर्माण करणे, समाजातील आर्थिक विसंगती प्रबोधनातून दूर करण्याचा प्रयत्न करणे. अशा सामाजिक कार्यामुळे शाहीर लोकशिक्षणाचे चालते बोलते विद्यापीठच वाटतात. समाजशास्त्राचे अनेक ग्रंथ अभ्यासण्यापेक्षा शाहिरांचा एक कार्यक्रम पाहणे व त्याची अनुभूती घेणे हे समतुल्य वाटावे एवढे प्रभावी सादरीकरण शाहीर करीत असत.

महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या शाहिरांनी महाराष्ट्रातील प्रत्येक सामाजिक प्रश्नाला स्पर्श केला होता. तळागाळातील समाजाला भेडसावणारे अनेक प्रश्न शाहिरांना अस्वस्थ करीत होते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी ते

अग्रेसर राहिले. राजारामबापू फाळके म्हणतात, ''स्वातंत्र्य संग्रामाच्या कालखंडामध्ये त्यांनी राष्ट्राला राष्ट्रवाद शिकवला. स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी ग्रामीण सुधारणांचा संदेश घेऊन त्यांनी जिल्हा लोकल बोर्डाच्या मदतीने अभिनव ग्रामसुधारणा मोहीम राबवली. प्रतापगडावरील शिवस्मारक व साताऱ्यातील प्रतापसिंह स्मारक यामध्ये शाहिरी बाण्याने त्यांनी या राष्ट्रपुरुषांची अस्मिता महाराष्ट्राला दाखवली. शासनाच्या कुळकायदा, तुकडेबंदी, समाजशिक्षण, अस्पृश्यता निवारण, स्त्रीशिक्षण, हुंडाबंदी, दारूबंदी, अल्पबचत, ग्रामविकास, पंचायत राज्य, कुटुंबनियोजन, हरितक्रांती या योजना आपल्या शाहिरी कार्यक्रमातून विचारमंथन करून सामान्य माणसांना पटवून दिल्या. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये परकीय सत्तेविरुद्ध व स्वातंत्र्योत्तर काळामध्ये देशी सत्तेविरुद्ध जनतेच्या न्याय्य हक्कासाठी झगडताना त्यांच्या शब्दांना तलवारीची धार येते. जनतेच्या आंदोलनात शाहिरांनी नेहमीच सैनिकाची भूमिका वठवली. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात केवळ शाहीर आघाडीवर होते. तथापि शाहिरांनी रजाकारणाचा कधी ध्यास घेतला नाही तर समाजकारणाचा हव्यास धरला. लोकांच्या जीवनातील सुखदु:खाचे प्रसंग जाणून त्यांची दुखणी त्यांच्या बोलीभाषेत मांडली''.[९] प्रस्तुत प्रतिक्रिया म्हणजे शाहिरांच्या व्यक्तिमत्वाचा आरसा आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा असो किंवा भारतीय स्वातंत्र्यसंग्राम असो. ग्रामसुधारणा असो की हरितक्रांती, सामाजिक समस्या, असो किंवा राष्ट्रीय समस्या शाहिरांनी समर्पणाने काम केले आहे. 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हे एकच ध्येय, ध्यास व उद्देश डोळ्यासमोर ठेवून या शाहिराने आयुष्यातील पन्नास वर्ष खर्च केली. आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक जडण-घडणीमध्ये शाहिरांचा मोलाचा वाटा आहे. शाहिरांनी आपल्या कलेच्या माध्यमातून समाजात एक वैचारिक क्रांती घडविली. महाराष्ट्र शासनाच्या शासन योजना समाजातील तळागाळातील लोकांपर्यतं पोहोचवून शाहिरांनी शासन व जनता यांना सांधण्याचा प्रयत्न केला. अशा अनेक वैविध्यपूर्ण कार्यक्रमांतून लोकांचे मनोरंजन करत करत शाहिरांनी नकळतपणे समाजाला लोकशिक्षण दिले आहे.

## समारोप

अशा प्रकारे शाहिरांनी समर्पक बोलीभाषेचा वापर करून गीते बहारदार केली आहेत. त्यांची शैली आगळी-वेगळी असल्याने समाजाने ती आंतरबाह्य स्वीकारली. त्यांना महाराष्ट्र, मराठी माती, मराठी भाषा यांच्याविषयी अत्यंत प्रेम होते. ''त्यांचे भाषाप्रेम अगदीच आगळे आहे. त्यांनी संतांचे आणि शाहिरांचे साहित्य पचवले आहे. एखाद्या माणसाच्या भाषेची लकब त्यांना आवडली की ती आत्मसात करण्यासाठी ते जीवाचा कोण आटापिटा करतात. ती लकब कार्यक्रमांतून सादर केल्याशिवाय त्यांना समाधान लाभत नाही. मराठी मर्दानी भाषा, मुलांची भाषा, स्त्रियांची भाषा व कोकणातील अथवा देशावरील भाषा यांतील सूक्ष्मभेद त्यांना अवगत आहेत. भाषेबरोबर शब्दचमत्कृती आणि शब्दालंकार यांच्यावर त्यांचे फार लक्ष. 'धनगर' शब्दाचे विवरण ते

'धनाचे आगर' करतील, 'सुफाळीच्या' शिवीची व्युत्पत्ती 'सु-काळीच्या' सांगतील अगं, अगा, अगे या शब्दांतील अर्थभेद स्पष्ट करतील. आपल्या दैनंदिन प्रवासात वा वाचनात आढळलेली व्यक्ती, प्रसंग अथवा शब्द, संवाद यांचे ते सतत संग्रह करीत असतात.''[७] ही त्यांच्याविषयीची इ.स. १९६९ सालच्या स्मरणिकेतील प्रतिक्रिया खूपच बोलकी आहे. शाहिरांच्या भाषाशैलीचा सर्वांगीण विचार या प्रतिक्रियेतून व्यक्त होतो.

भ्रमणभाष : ९६०४०४६०८४

**संदर्भ टीपा :**

१) धोंड म.वा. : 'मराठी लावणी', मौज प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली, १९५६, पृ.क्र. १२.
२) गुजर जयवंत (संपा.) : स्मरणिका, 'लोकशाहीर फरांदे गुणगौरव समारंभ' दि. २८ सप्टेंबर १९६९ पृ. क्र. ५९.
३) तत्रैव : पृ.क्र. ५७
४) तत्रैव : पृ.क्र. २१
५) तत्रैव : पृ.क्र. ४१
६) तत्रैव : पृ.क्र. ५८
७) तत्रैव : पृ.क्र. २९.

■■■